आज़ादी का अमृत महोत्सव

MAH/NAN/10936/2015
ISSN : 2454-7905
SJIF 2021 - Impact Factor : 7.479

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

(A Peer Reviewed)

Year - 7, Vol. II, Issue- LII, 29 March 2022

# ECONOMY



- Editor -

**Mrs. Pallavi Laxman Shete**

Address for Correspondence

***Mrs. Pallavi Laxman Shete***

Editor in Chief : Worldwide International Inter Disciplinary Research Journal (A Peer Reviewed Reffered)
Principal, Sanskriti Public School, Nanded (MH, India) Email : shrishprakashan2009@gmail.com

***Dr. Rajesh G. Umbarkar***

House No. 624 - Belanagar, Near Maruti Temple, Taroda (Kh.) Nanded - 431605 (India - Maharashtra)
Email - umbarkar.rajesh@yahoo.com, shrishprakashan2009@gmail.com Mob. No. 9623979067
Director : Mr. Tejas Rampurkar (For International Contacts only + 91-8857894082)

(Arts - Humanities - Social Sciences - Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical, Ayurveda, Pharmaceutical, Journalism, Mass Communication, Library Science Faculty's)

## Editorial Board


| | |
|---|---|
| **Dr. S.V. Shivanikar**<br>Principal<br>N.S.B.College. Nanded. (MH., India.) | **Dr. Deepak Dwarkadasrao Bachewar**<br>**Associate Professor**<br>Vasantrao Naik College. Vasarni. Nanded- (MH., India.) |
| **Dr. P. Neelkantrao**<br>Dept. of Economics. Pratibha Niketan Mahavidyalaya. Nanded. (MH., India.) | **Dr. Suhas Pathak**<br>Dept. of School of Media studies<br>S.R.T.M.U. Nanded. (MH., India.) |
| **Dr.Pramod Ravindra Deshpande**<br>Wake Forest School of Medicine.<br>Dept. of Cancer Biology.Winston Salem. NC. USA. | **Dr. Sachin G. Khedikar**<br>Principal & Professor.Dept. of Rachana-Sharir, Shri. O. H. Nazar Ayurved College, SURAT (India.) |
| **Dr Ashutosh Gupta**<br>Dept. of Sanskrit. HNB Garhwal University. Srinagar Garhwal Uttrakhand 246174 (India.) | **Dr. Mayuresh M. Rampurkar**<br>Sardar Vallabhbhai Patel Hospital.(Neurosurgery).Ahmedabad. (G.India.) |
| **Dr. Manish Deshpande**<br>N.S.B.College. Nanded. (MH., India.) | **Dr. Kulkarni J. N.**<br>Library sci.<br>S.R.T.M.U.Nanded. (MH., India.) |


## Co-Editorial Board


| | |
|---|---|
| **Dr. N. N. Bandela**<br>Dept. of Envi. Science<br>Dr.B.A.M.U. Aurangabad. (MH., India.) | **Dr. Suman K. S.**<br>Dept. of Oriental languages.<br>Loyola College.(Autonomous) Affiliated to University of Madras.Nungambakkam, Chennai-600034 (India.) |
| **Dr. S. P. Hangirgekar**<br>Dept. of Chemistry<br>Shivaji University. Kolhapur. (MH., India.) | **Dr. Baswaprabhu Jirli**<br>Dept. of Extension Education. Institute of Agricultural Sci.<br>BHU. Varanasi. (India.) |
| **Smt. Martha B.**<br>Department of English. Dr. B.R. Ambedkar F.G. College. Ladgeri. Bidar. Karnataka (India.) | **Dr. Chandan Bora**<br>Dept. Of Commerce<br>(MH., India.) |
| **Dr. Mahesh Joshi**<br>Dept. Of Education<br>S.R.T.M.U. Nanded.(MH., India.) | **Dr. Mangesh W. Nalkande**<br>Dept. of Kayachikitsa<br>Govt. Ayurved College. Nanded. (MH., India.) |
| **Dr. Viraj Vilas Jadhav**<br>Professor and HOD. Dept. of Rachanasharir. Shri dhanwantry ayurvedic College and hospital sector 46 B CHANDIGARH. (India.) | **Dr. M.B. Kulkarni**<br>Govt. Medical College. Nanded. (MH., India) |

# INDEX


| Sr. No. | Title of the Paper | Name of Author | Page No. |
|---|---|---|---|
| 01. | महाराष्ट्रातील मानव विकासाचे वास्तव आणि उपाययोजना | प्रा. पंढरीनाथ दिसागज | 01 |
| 02. | केंद्र - राज्य घटनात्मक आर्थिक सहसंबंध | डॉ. सी. डी. राजपुत | 07 |
| 03. | क्रिप्टो करन्सी- एक अभ्यास | प्रा. सुजाता वसंत आहेर<br>डॉ. बी. एस. आव्हाड | 11 |
| 04. | सेंद्रिय शेती : एक काळाची गरज | प्रा. रामेश्वर भाऊसाहेब पवार | 14 |
| 05. | कोरोना आणि भारतीय अर्थव्यवस्था | प्रा.डॉ.आर.पी. पाटील<br>जनार्दन जानजी देवरे | 19 |
| 06. | उदयोन्मुख भारतीय अर्थव्यवस्थेपुढील आव्हाने | प्रा. डॉ. डी. एन. सोनवणे | 22 |
| 07. | भारतीय भाषांमध्ये उच्च शिक्षण | प्रा. डॉ. देशमुख बिभीषण | 26 |
| 08. | आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्रातील अभ्यासात विनिमय दराचे महत्व संकल्पना आणि प्रकार | Dr. Sunita B Ahire | 30 |
| 09. | स्त्रियांचे श्रम आणि अर्थकारण | अजय एकनाथ अहिर | 39 |
| 10. | भारतीय महिलांचे आर्थिक सबलीकरण | ज्योती प्रविणचंद्र पाटील<br>जयश्री पुरुषोत्तम सरोदे | 43 |
| 11. | राष्ट्रीय कृषी पीक विमा योजना : सिंहावलोकन | डॉ. एम. व्ही. हिरे | 47 |
| 12. | कृषीक्षेत्र ते सेवाक्षेत्र, अर्थजगतात स्वतंत्र भारताचा समृद्ध प्रवास! | राजेश गंगाधरराव उंबरकर | 52 |
| 13. | कृषी क्षेत्रात माहिती तंत्रज्ञानाचे योगदान | सुजाता रविंद्र मगरे | 55 |
| 14. | महात्मा ज्योतीराव फुले यांचे सामाजिक योगदान | प्रा. जे. आर. भावसार | 57 |
| 15. | २१ व्या शतकातील मराठी चित्रपटांचे बदलते रूप व आर्थिक वाटचाल. | जयराम राजीव माळी | 59 |
| 16. | मराठवाडा विभागातील वैद्यकीय पायाभूत सुविधेचा अभ्यास | विठ्ठल हरिभाऊ नागरे<br>डॉ. जी. आर. खेडकर | 63 |
| 17. | भारतातील बेकारीची भिषणता | डॉ. राजेंद्र एन. बोरसे | 70 |
| 18. | महिला सक्षमीकरणातील महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची भूमिका एक चिकित्सक अभ्यास | कामिनी शशिकांत देवरे<br>डॉ. बी. एम. सोनवणे सर | 72 |
| 19. | नाशिक जिल्ह्यातील लोकसंख्या वितरण : तुलनात्मक विश्लेषण | प्रा. एस. आर. पगार | 77 |
| 20. | भारतीय आर्थिक सुधारणा | जीवन अशोक गुंजाळ | 80 |
| 21. | जागतीकीकरण : भारतीय शेती आणि अर्थव्यवस्था एक अभ्यास | प्रा. पी. डी. हुडेकर | 83 |
| 22. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार आणि सद्यस्थितीतील उपयुक्तता | नंदिनी मनोज लखेरी | 89 |

| | | | |
|---|---|---|---|
| 23. | महाराष्ट्र राज्याची जमीन धारणा आणि तृणधान्यपीक पद्धतीचा अभ्यास | प्रा. रघुनाथ मुरलीधर आंबेकर | 93 |
| 24. | जलव्यवस्थापन, जलसिंचन - काळाची गरज | राहुल मोरेश्वर लभाने | 97 |
| 25. | "असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांचा सामाजिक, आर्थिक व आरोग्य विषयक स्थितीचा अभ्यास विशेष संदर्भ नाशिक शहर" | महेंद्र जयवंत खरे<br>प्रा. डॉ. शामराव भगवान वायसे | 103 |
| 26. | 21 व्या शतकातील भारताचा औद्योगिक विकास | अहिरे पूजा मनोहर | 115 |
| 27. | केंद्र – राज्य आर्थिकसंबंध : सिंहावलोकन | BIRARI TANMAY SHARAD | 119 |
| 28. | आंतरराष्ट्रीय संबंधातील नवीन राजकीय अर्थव्यवस्था | प्रा. डॉ. मनिष सोनवणे | 124 |
| 29. | भारतातील डिजिटल शेतीचे भविष्य | डॉ. मनोज व्ही. जगताप<br>डॉ. हिरामण एम. क्षीरसागर | 132 |
| 30. | भारतातील सहकार आणि महिला सबलीकरण | प्रा. इंद्रजित ऐवळे | 135 |
| 31. | शेतमाल विक्री व्यवस्थेतील समस्या आणि उपाय | डॉ. एम. जी. थोपटे | 139 |
| 32. | दारिद्र्य आणि बेरोजगारी देशाच्या आर्थिक विकासातील एक अडथळा | प्रा. पारधी प्रवीण सोमा | 144 |
| 33. | केंद्र- राज्य वित्तीय संबंध<br>Central -State Financial Relation | प्रा. डॉ. जगदीश देशमुख | 150 |
| 34. | कृषि विकासामध्ये नवीन तंत्रज्ञानाची भूमिका आणि परिणामांचा अभ्यास | डॉ. विठ्ठल फुलारी<br>पवन चुंगडे | 154 |
| 35. | कृषीव्यवसाय उद्योग क्षेत्र संधी आणि आव्हाने<br>(Agri-business Industries Opportunities & Challenges) | प्रोफेसर डॉ. सुहास आव्हाड<br>डॉ. गणेश वाळुंज | 158 |
| 36. | केंद्र-राज्य वित्तीय आणि राजकीय संबंध | बालाजी सोनबा खरोडे | 162 |
| 37. | केंद्र व राज्य आपत्तीच्या स्थितीत राजकीय संबंधांचा अभ्यास | प्रा. डॉ. स्वामी विरभद्र गुरप्पा | 167 |
| 38. | दारिद्रय आणि बेरोजगारी | प्रा. डॉ. खोकले आर. के. | 173 |
| 39. | "नाशिक जिल्ह्यातील शेती विकासात कृषीपर्यटनाची भूमिका" | वाघ जीवनकुमार शामराव<br>डॉ. हिरामण मधुकर क्षिरसागर | 179 |
| 40. | "शेतकरी आठवडे बाजार एक अर्थार्जन रोजगार" | प्रा. पंकजकुमार सुरेश गांगुर्डे | 184 |
| 41. | शेती विकासाच्या दृष्टिकोनातून कन्नड तालुक्यातील पशुधनाचा आढावा | डॉ. सुनिल अण्णा गोरडे | 189 |
| 42. | "आदिवासी समूहाच्या पर्यावरण जतन करण्याच्या परंपरा" | गुमाडे समाधान बापू | 195 |
| 43. | भारतीय अर्थव्यवस्था: विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीसाठी आकर्षण केंद्र . | दिलीप आप्पा जगताप | 197 |
| 44. | शिवकालीन जलव्यवस्थापन<br>(Water Management in Chhatrapati Shivaji's Period) | प्रा. डॉ. सुनिता विजय रणाते | 200 |
| 45. | महिला सक्षमीकरण – राज्य शासनाची भूमिका | प्रा. कविता किसन भोये | 204 |
| 46. | भारतीय शेतीचा इतिहास | प्रा. डॉ. एम. आर. खोत | 208 |

| | | | |
|---|---|---|---|
| 47. | नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन व शाश्वत विकास काळाची गरज | डॉ. काळनर सुनिता | 212 |
| 48. | नाशिक जिल्ह्याच्या आर्थिक विकासात नैसर्गिक साधनसंपत्तीची भुमिका | नामदेव कारभारी डफळ<br>प्रा. डॉ. सुहास आव्हाड | 217 |
| 49. | नासिक जिल्ह्यातील जलसिंचनाचा झालेला विकास" एक भौगोलिक अध्ययन. (महाराष्ट्र) | भगवान श्याम भाऊ निकम | 223 |
| 50. | नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण व नागरी लोकसंख्या बदलाचा चिकित्सक अभ्यास (सन १९७१ -२०११) | डॉ. अनिल डी. पवार | 228 |
| 51. | भारतातील बँकिंग आणिवित्तीयक्षेत्र: सिंहावलोकन | भुषण तात्यासाहेब शिरोळे | 231 |
| 52. | कृषी विपणन आणि त्यातील समस्या | श्वेताली देविदास सोनवणे | 237 |
| 53. | भारतातील बँकिंग क्षेत्रातील बदलांचे अवलोकन | गणेश बळवंत वाघ | 240 |
| 54. | कच्च्या तेलाच्या किंमती आणिभारतीय अर्थव्यवसस्था | प्रा. डॉ. एस. एन. बोढरे<br>प्रा. के. एस. चौधरी | 243 |
| 55. | "महाराष्ट्रातील सर्व शिक्षा अभियान योजनेचे मूल्यमापन" | ज्ञानदेव सुभाषकूवर | 247 |
| 56. | ग्रामीण विकासातील नाबार्डच्या भूमिका | पूजा बाळू उशीर | 250 |
| 57. | कृषी विपणन प्रक्रियेत होणाऱ्या बदलांचे आर्थिक विश्लेषण | समर्थ शरद गोऱ्हे | 253 |
| 58. | ग्रामीण भागामध्ये आर्थिक समावेशन साध्य करण्यात व्यवसाय प्रतिनिधींच्या भूमिकेचाचिकित्सक अभ्यास | योगेश लक्ष्मण भारस्कर<br>डॉ. आशालता सोनवणे | 256 |
| 59. | भारतीय आरोग्य विमा (Health insurance ) | *तुषार बापू पवार* | 260 |
| 60. | उद्योजकता : बेरोजगारी दूर करण्यासाठी काळाची गरज | प्रा.उदय खंडू टेके<br>डॉ.सोमनाथ भागा सानप | 264 |
| 61. | भारतीय आर्थिक सुधारणा | जीवन अशोक गुंजाळ | 268 |
| 62. | ई–बॅकींग मधील आधुनिक प्रवाह | प्रा. डॉ. सावंत रजनी नामदेवराव | 271 |
| 63. | महिला सबलीकरणात शासनाच्या उपाययोजना | डॉ. नानासाहेब बी. दाभाडे | 274 |
| 64. | केंद्र – राज्य आर्थिक संवंध : सिंहावलोकन | Wadge Kunal Dipak. | 278 |
| 65. | शेती तंत्रज्ञान व उत्पादकता | श्री. संदिप नारायण अहिरे | 283 |
| 66. | कृषी व्यापार व व्यावसायिक दृष्टीकोन : एक काळाची गरज | डॉ. डी. व्ही. हारगिले | 287 |
| 67. | भारतातील ग्रामीण विकासाची दशा आणि दिशा | प्रा. अमोल पर्वत गरुड | 291 |
| 68. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि आर्थीक-सामाजिक सुधारणा | श्रुती उमेश दोडे | 297 |
| 69. | ाजेट२०२२ :देशाच्या उज्वल भवितव्याचा योग्य मापदंड-सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन! | जाधव रूपाली निवृत्ती<br>डॉ. अमोल गायकवाड | 302 |
| 70. | भारतीय शेतीच्या शाश्वत विकासासाठी आधुनिकीकरण | डॉ. एस. पी. देवरे | 305 |
| 71. | वित्त आयोग व केंद्र - राज्य राजकीय - वित्तीय सहसंबंध | प्रा. एन. ए.पाटील | 308 |
| 72. | ऑनलाईन-ऑफलाईन संमिश्र शिक्षण पद्धतीचे सहअस्तित्व : काळाची गरज | प्रा. बी. एस. निकम | 313 |
| 73. | भारतातील बँकिंग आणि वित्तीयक्षेत्र: सिंहावलोकन | दिनेश नाना कुंभार | 317 |

| | | | |
|---|---|---|---|
| 74. | भारतातील बँकिंग आणिवित्तीयक्षेत्र: सिंहावलोकन | पृथ्वीराज रत्नाकर शेलार | 320 |
| 75. | विपणन ही एक आर्थिक प्रक्रिया | हेमंत सुधीर खोंडे | 323 |
| 76. | कृषी क्षेत्रात माहिती तंत्रज्ञानाचे योगदान | प्रफुल्ल मन्साराम अहिरे | 326 |
| 77. | कृषी क्षेत्रातील तंत्रज्ञान विकास | सुखदेव पांडुरंग नागरे | 332 |
| 78. | भारतीय अर्थव्यवस्थेवर COVID-19 चा परिणाम | अक्षय समाधान कदम | 336 |
| 79. | महिला सबलीकरण : एकविसावे शतक | प्रा. डॉ मीनाक्षी पुंडलिक पाटील | 343 |
| 80. | कृषी विपणन | बुद्धप्रिया संजय यशोद | 348 |
| 81. | 'जल प्रदूषणावर उपाय सुचवणे' | आरती प्रकाश वारुळे | 361 |
| 82. | ऑनलाईन शिक्षण अँड डिजिटल इंडिया | डॉ. दिपक वसंत चव्हाण | 363 |
| 83. | महिला सबलीकरण एक प्रेरणादायी उदबोधन | प्रा. एल के पवार | 366 |
| 84. | डिजिटल शिक्षण | संतोष रामराव डवरे | 370 |
| 85. | "भारतीय अर्थव्यवस्थेतील ग्रामीण विपणनातील समस्या आणि आव्हाने" | प्रा. रामदास त्र्यंबक तुपलोंढे | 372 |
| 86. | भाववाढ एक चिकित्सक अध्ययन | Dr. Sunita B. Ahire | 377 |
| 87. | महात्मा ज्योतीराव फुले यांचे सामाजिक योगदान | प्रा. जे. आर. भावसार | 387 |
| 88. | 21 वीं शती में आदमी की खोज़ (डॉ.गिरिराजशरण अग्रवाल के 'आदमी है कहाँ ?' के विशेष संदर्भ है) | डॉ.राजाराम शेवाळे | 389 |
| 89. | समाज सुधारक राजा राममोहन रॉय यांच्या विचारांची प्रासंगिकता | प्रा. श्री. आर. के. सुर्यवंशी | 393 |
| 90. | ग्रामीण विकासाचा सुधारित केंद्रीय दृष्टीकोन | प्रा. डॉ. पी. टी. निकम | 396 |
| 91. | جدید تکنیکی ذریعۂ تعلیم اور اُردو | Dr. Siddiqui Shaheena Parwin Md. Ilyas | 403 |
| 92. | پرنٹ اور ڈیجیٹل میڈیا میں روزگار کے مواقع | پروفیسر سعدیہ پروین نہال احمد | 408 |
| 93. | ڈیجیٹل تعلیم :مواقع،خطرات اور چیلنجر | Miss.Shaziya Nausheen Jaleel Ahmed. | 412 |
| 94. | गरिबी आणि बेरोजगारी | अहिरे साक्षी किशोर | 417 |
| 95. | डिजिटल एज्युकेशन इंडिया | अर्पना सुरेंद्र येवले | 420 |
| 96. | पंचायतराज आणि महिला ..... | संतोष रामराव डवरे | 422 |

# भारतातील ग्रामीण विकासाची दशा आणि दिशा

प्रा. अमोल पर्वत गरुड

सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग म.स.गा. कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मालेगाव कॅम्प, ता. मालेगाव जि.नाशिक

**प्रस्तावना:-**

मानवी समाज हा अनेक लोकांचा समुह असतो. मानवी उत्क्रांतीच्या सुरुवातीच्या काळात माणूस जंगलात राहायचा, विखुरलेल्या स्वरूपात असायचा. फळे, कंदमूळे खाऊन व शिकार करून आपली अन्नाची गरज भागवत असायचा. कालांतराने हे सर्व लोक समूहात राहू लागले. समाज तयार होऊ लागला. वाड्या, वस्त्या, खेडी त्यातून तयार झालीत. त्यातूनच अनेक संस्कृती जगात रुजल्या गेल्या. या मानवी उत्क्रांतीच्या प्रवासात कालांतराने अनेक बदल मानवी समाजात घडून आले. शहरीकरणाचे प्रमाण ही झपाट्याने वाढू लागले, असे असले तरी जगभर शहरांचा सतत विकास होत असून सुद्धा 1950-51 मध्ये जागतिक लोकसंख्ये पैकी सुमारे 80 टक्क्यांच्या जवळ पास लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्य करीत होती. भारतातही 1960-70 च्या दशकात ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण 80 टक्क्यांपेक्षा अधिक होते.

आपल्या देशात स्वातंत्र्योत्तर कालखंडात आर्थिक नियोजनाचा अवलंब करून राष्ट्राचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी ग्रामीण विकास अत्यंत आवश्यक असतो, त्यासाठी म्हणूनच ग्रामीण समस्यांचे स्वरूप नीट पणे समजावून घेऊन त्या सोडविण्याच्या दृष्टीने कसोशीने प्रयत्न करावे लागतात आणि त्यातूनच योग्य तो मार्ग शोधता येऊ शकतो. याची जाणीव राज्य कर्त्यांना झाली, तेव्हा पासून अनेक विविधांगी उपक्रमांची अंमलबजावणी करून देशाच्या ग्रामीण भागाच्या विकासाकडे लक्ष केंद्रीत करण्यात आले... ते आजतागायत चालूच आहेत. 1914 ते 1918 दरम्यान लढल्या गेलेल्या पहिल्या महायुद्धानंतर भारतातील परंपरागत व स्थानिक कुटिरोद्योग, तसेच इतर उद्योगधंद्यांना अधिकाधिक प्रोत्साहन देण्याचे धोरण अवलंबिले गेले. शहरिकरणात वेगाने वाढ होऊ लागली. 1961 च्या जनगणने नुसार ग्रामीण भागाचा विचार करता, भारतात लहान लहान खेड्यांची व वस्त्यांची संख्या अधिक आहे असे दिसते. तरी सुध्दा 1961 च्या जनगणनेत भारतातील इतर राज्यांच्या तुलनेने महाराष्ट्रात औद्योगिकीकरण व शहरीकरणाचे प्रमाण अधिक वाढले आहे. पुढे एका दशकांनंतर 1971 च्या जनगणने नुसार महाराष्ट्र हे भारतातील सर्वात अधिक नागरीकरण झालेले राज्य आहे. 1971 साली महाराष्ट्र राज्याचे लोकसंख्ये नुसार विवरण बघितल्यास नागरी लोक संखेचे प्रमाण 31.2% तर ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण 68.8% इतके असून खेडे गावांची संख्या 35,851 इतकी आहे. आर्थिक तसेच शैक्षणिक निकषांधारीत ढोबळ मानाने तुलना केली असता आपणास शहरी व ग्रामीण भागातील फरक त्वरित जाणवतो. शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागाचा मागासले पणा स्पष्ट लक्षात येतो. वाहतूक व दळणवळणाच्या सोयी ग्रामीण भागात फारच अपुऱ्या आहेत. आरोग्य विषयक सोयी सुविधांचा ही खेड्यात अभावच आहे.

**उद्देश :-**

स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्यानंतरच्या काळात ग्रामीण विकासा बाबतचा दृष्टीकोण कशा पद्धतीने उत्तरोत्तर विकसित होत गेला? त्याची नेमकी दिशा काय होती? शासना कडून वेळोवेळी राबविण्यात आलेल्या विविध

योजना व उपक्रमांची त्यात भूमिका नेमकी काय होती? याविषयीची माहिती सविस्तर समजून घेणे हा प्रस्तुत शोध निबंधाचे उद्देश आहे.

तथ्य संकलन :-

प्रस्तुत शोध निबंध हा प्रामुख्याने दुय्यम साधन समग्रीवर आधारित आहे. त्यासाठी विविध पुस्तके, मासिके, शासकिय संकेत स्थळे तसेच वर्तमान पत्रातील लेख यांच्या साहाय्याने उपरोक्त शोध निबंधासाठी तथ्य संकलन केले आहे.

**विश्लेषण :-**

"तुम्हाला भारत बघावयाचा असेल तर खेड्यांकडे चला" असे आदरणीय गांधीजी म्हणत असत. कारण कुठल्याही देशाच्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक विकासात ग्रामीण समाज नेहमी उल्लेखनीय कामगिरी बजावीत असतो. शेती हा ग्रामीण भागातील प्रमुख व्यवसाय असतो. त्यामुळे ती लोकं अन्नधान्ये व इतर कच्चा माल यांचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर घेत असतात. शहरांच्या अशा विविध प्रकारच्या गरजा ग्रामीण उत्पादनातूनच भागविल्या जातात. त्याच बरोबर शहरांतील औद्योगिक व्यवसायांना मजूर वर्गाचा पुरवठा करण्याची जबाबदारी ही ग्रामीण भागच पारपाडत असतो. नैसर्गिक साधन संपत्तीच्या बाबतीत ही ग्रामीण भाग स्वयंपूर्ण असलेला दिसून येते. भारता सारख्या विकसनशील देशात तर ग्रामीण विकासाच्या मुद्द्यावर लक्ष केंद्रित करण्याची विशेष गरज असल्याचे जाणवते. ग्रामीण जनता ही परंपरा प्रिय असते त्यांना आधुनिक शास्त्रीय दृष्टिकोण पटवून देऊन आर्थिक विकासाच्या मार्गावर आणणे मोठे जिकिरीचे काम आहे. त्यासाठी प्रशासनाला विविध उपाय योजना कराव्या लागतात. आर्थिक विकासाच्या आड येणाऱ्या सामाजिक रूढी व चालीरीती यांचे ग्रामीण जीवनातील वर्चस्व कमी व्हावे, म्हणून शिक्षणाच्या वदळणवळणाच्या सोयी भरपूर प्रमाणावर पुरवून ग्रामीण जनतेला विकासोन्मुख केल्यानंतरच ग्रामीण विकासाचे पाऊल पुढे पडू शकते. भारतातील ग्रामीण विकासाचा इतिहास पाहू गेल्यास असे आढळते की, भारत हा खेड्यांचा देश आहे. तीर्थक्षेत्रे व राजधान्यांची ठिकाणे हीच कायती मोठी शहरे असायची. बाकी सर्व खेडी. एकोणिसाव्या शतकात भारतातील औद्योगिकीकरणाला सुरुवात झाली. इंग्लंड मधील कारखानदारी मुळे येथील परंपरागत उद्योग बसले. बेकार कारागीर शहरात नोकरी धंदा शोधायला जाऊ लागले पण तेथे ही उद्योगांची वाढ फारशी न झाल्याने अशा बेकार कारागिरांना शेतीकडे वळावे लागले. भारतातील शहरीकरणाचा वेग त्यामानाने बराच मंद आहे.

**ग्रामीण भागातील समस्यांचा वेध :**

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतातील ग्रामीण भागाकडे व विशेषतः शेतीच्या विपन्नावस्थेकडे 1880 च्या नंतर च्या काळात दादाभाई नौरोजी, रमेश चंद्र दत्त यां सारख्या लोकांनी तत्कालीन शासन कर्त्यांचे लक्ष वेधले. त्याकाळात अनेक वेळा दुष्काळ आयोग ही नेमले गेले पण शेती व एकंदरीत ग्रामीण जनतेच्या प्रश्नांची अभ्यास पूर्ण उकल करण्याचे प्रयत्न 1924 सालच्या 'रॉयल कमिशन ऑन ॲग्रिकल्चर' ह्या आयोगाने केले. त्याचा अहवाल त्यांनी 1928 च्या अखेरीस सादर केला. राष्ट्रीय चळवळीतील सक्रियावस्थेत म. गांधींनी खेड्यांची दुर्दशा जवळून अनुभवली होती. तरुणांसाठी 'खेड्याकडे चला' असा नारा त्यांनी दिला. ग्रामीण जनतेच्या सर्वांगीण विकासासाठी स्थानिक ग्रामोद्योगांचे पुनरुज्जीवन करणे हा मार्ग त्यांनी सुचविला. त्यांच्या प्रयत्नांमुळे ग्रामीण प्रश्नांना व्यापक व्यासपीठ उपलब्ध झाले. 1935 साली भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या राष्ट्रीय नियोजन समितीने शेती, ग्रामोद्योग,

ग्रामशिक्षण, आरोग्य, वाहतूक व दळणवळणाच्या सोयी अशा विविध प्रश्नांचा उहापोह केला. त्यांच्या शिफारशी नुसार 'भारतीय कृषी अर्थशास्त्र संस्था' (इंडियन सोसायटी ऑफ ॲग्रिकल्चरल इकॉनॉमिक्स) ही संस्था मुंबईला स्थापन करण्यात आली. संकल्पनेला प्रत्यक्ष कृतीची जोड देऊन म. गांधींच्या 'सेवाग्राम' आश्रम व बंगाल मधील कविवर्य रवींद्रनाथ टागोरांनी शांतिनिकेतनला सुरू केलेले 'श्रीनिकेतन' हे ग्रामविकास केंद्र, वाय्. एम्. सी. ए. (मार्तंड, केरळ, 1921), एफ्. एल्. शेन (गुरगाव, पंजाब, 1927), व्ही. टी. कृष्णमाचारी (बडोदा संस्थान, 1932), मद्रास सरकार (फिरका विकास योजना, 1946), एम्. के. डे (निलोखेरी, पंजाब, 1948), बडोदे संस्थानाने सुरू केलेले ग्रामीण विकासाचे स्वतंत्र खाते, काही मिशनरिंकडून केली गेलेली ग्राम विकासाची कामे, इ. व्यक्ती आणि संस्थायांचं कार्य विशेष उल्लेखनिय होते. स्वातंत्र्यपूर्व भारतातील प्रांतिक सरकारांनी शेती, शिक्षण, आरोग्य, सहकार वगैरे खात्यांकडून ग्राम विकासासाठी राबविलेले उपक्रम यांमार्फत ग्रामीण विकासाचा नवा दृष्टिकोन निर्माण केला गेला.

**स्वातंत्र्योत्तर काळातील सरकारची धोरणे :**

15 ऑगस्ट 1947 रोजी मिळालेल्या स्वातंत्र्या नंतर देशाच्या ग्रामीण भागातील सामाजिक, आर्थिक विकासाच्या प्रश्नांकडे विशेष लक्ष देणंही काळाची गरज होती. वाढत्या लोकसंख्येची अन्नाची गरज भागविण्यासाठी अन्नधान्याचे उत्पादन वाढविणे ही मोठी आव्हानात्मक समस्या होती. त्यासाठी नेमण्यात आलेल्या 'अधिक धान्य पिकवा चौकशी समिती' च्या 1951 च्या अहवालानुसार शेती सुधारणे बरोबरच ग्रामीण विकासाच्या समग्र समस्या विषयी काही शिफारशी मांडण्यात आल्या. त्या विचारांतूनच पुढच्या काळात "समूदाय विकास कार्यक्रम" व "राष्ट्रीय विस्तार सेवा योजना" या महत्त्व पूर्ण योजना आखण्यात आल्या. या योजनांच्या कामकाजात पुढे प्रसंगानुरूप काही बदल केले गेले पण ग्रामीण विकासाला पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून महत्त्व पूर्ण स्थान द्यायला हवं, हे तेव्हा पासून निश्चित केले गेले.

**समुदाय विकास कार्यक्रम :**

1950 नंतरच्या काळात ग्रामीण विकासाच्या प्रश्नांना योग्य न्याय देण्यासाठी, सरकारच्या वेगवेगळ्या विभागां मार्फत आखलेल्या कार्यक्रमांना, योजनांना पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून राबविण्यात येऊ लागले. त्या अनुषंगाने विविध विभागांमार्फत आखण्यात येणाऱ्या विविध योजना व कार्यक्रम यांच्या अंमलबजावणीत अधिक परिणामकारकता यावी, सामाजिक सोयी – सुविधांमध्ये वाढ व्हावी, ग्रामीण भागातील कृषी, पशुपालन, ग्रामोद्योग आरोग्य व बाल कल्याण इत्यादी क्षेत्रात लोकांच्या जीवन स्तरांमध्ये वाढ करणे आणि महत्वाचं म्हणजे या कार्यक्रमांच्या अंमलबजावणीत स्थानिक ग्रामीण जनतेला जास्तीत जास्त सहभागी करून घेण्याच्या हेतूने पहिल्या पंचवार्षिक योजनेत समुदाय विकास कार्यक्रम हा ग्रामीण विकासाचे अंगमानण्यात येऊन या कार्यक्रमाची आखणी करण्याचा निर्णय पहिल्या पंचवार्षिक योजनेत घेण्यात आला. सुमारे साठ ते सत्तर हजार लोकसंख्या असलेला प्रदेश एक विकास गट मानायचा, विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी एक गट विकास अधिकारी व त्याच्या नेतृत्वाखाली शेती, पशुपालन, सामाजिक शिक्षण, सहकार, अशा प्रत्येक विभागासाठी एकेक विस्तार अधिकारी, एक पर्यवेक्षक इतका कर्मचारी वर्ग प्रत्येक गटासाठी नियुक्त करायचा. रस्ते सुविधा, शाळांच्या इमारती, पिकांच्या जलसिंचन योजना, समजामंदिरे वगैरे स्थानिक विकासाचे प्रकल्प हाती घ्यायचे, त्यांच्या खर्चापैकी काही भाग (1/3 ते 1/10) स्थानिक गावातील लोकांनी श्रमदानाच्या स्वरूपात द्यायचा, असे

यायोजनेचे थोडक्यात स्वरूप सांगता येईल. भूसुधारणेसाठी व्यापक स्तरावर राष्ट्रीय विस्तार सेवा योजना राबविण्यात आली. या योजने नुसार प्रत्येक विकास गटात दहा ग्राम सेवक नियुक्त केले जात. शेतकऱ्यांना शेतीच्या नव्या तंत्रज्ञाना विषयी माहिती देणे, सुधारित बी-बियाणे उपलब्ध करून देणे, खतांच्या योग्य व्यवस्थापना विषयी माहिती देणे, ही कामे ग्राम सेवकाकडे देण्यात आली.

समूदाय विकास कार्यक्रमाची सुरुवात 2 ऑक्टोबर 1952 रोजी करण्यात आली. 1957-58 पर्यंत भारताच्या 1/3 ग्रामीण भागात ह्या योजनेची अंमलबजावणी करण्यात आली. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेर पर्यंत ही योजना भारतातील जवळ पास सर्वच ग्रामीण भागांत सुरू करण्यात आली. या योजनेसाठी पहिल्या पंचवार्षिक योजनेत रु. 46 कोटी तर दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत रु. 190 कोटी रुपये इतका खर्च करण्यात आला. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत रु. 305 कोटींची तरतूद करण्यात आली. चौथ्या पंचवार्षिक योजनेत या कार्यक्रमांवरील खर्च कमी करण्यात येऊन राज्य सरकारांच्या अखत्यारीतील योजनांमध्ये या कार्यक्रमासाठी रु. 85 कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

समूदाय विकास कार्यक्रमाचे मूल्यमापन करण्याचे काम नियोजन मंडळाच्या 'कार्यक्रम मूल्यमापन संघटने' मार्फत प्रत्येक वर्षी केले जात असे. 1956 सालच्या बलवंतराय मेहता यांच्या अध्यक्षते खाली नेमण्यात आलेल्या एका अभ्यास गटाच्या शिफारशी नुसार समूदाय विकास कार्यक्रमाच्या प्रशासकीय रचनेत व कार्यक्रमाच्या तपशिलात अनेक बदल केले गेले. पंचायत राज संकल्पनेचा अंगीकार करून गाव, तालुका आणि जिल्हा पातळीवर विविध विकास कार्यक्रमांची जबाबदारी लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींकडे वर्ग करण्यात आली. अशा प्रकारे समुदाय विकास कार्यक्रमाची आखणी करून ग्रामीण विकासाला गती देण्याचे प्रयत्न केले गेले.

ग्रामीण विकासाचे प्रश्न हे मुख्यतः तीन स्वरूपाचे आहेत:

१) व्यवसायांचा विकास २) सामाजिक गरजां व सुविधांचा विकास (३) सांस्कृतिक, सामाजिक आणि वैचारिक दृष्टिकोनांत बदल घडवून आणणे.

**आर्थिक व व्यावसायिक विकास :**

रोजगाराची अनुपलब्धता व बहुसंख्यजन संख्येचे निम्न उत्पन्न कमी ही भारतातील व महाराष्ट्रातील ग्रामीण अर्थव्यवस्थेची मुख्य लक्षण सांगता येतील. परंपरागत शेती हा तेथील उदर निर्वाहाचा मुख्य आधार. ग्रामीण भागातील जवळपास 90% लोकसंख्या शेती व शेतीपूरक व्यवसायांवर अवलंबून आहे. त्यामुळे अनपेक्षित पणे शेतीवरील लोकसंख्येचा ताण वाढला असून, शेतीचे मोठया प्रमाणावर तुकडीकरण झाले परिणामी शेतीवरील उत्पादन क्षमतेवर ही यामुळे विपरीत परिणाम घडून येत आहेत. बेरोजगारी अनविशेषतः हंगामी बेरोजगारीचे प्रमाण या व्यवसायात अधिक आहे. शेत जमिनीच्या वाटपात ही मोठ्या प्रमाणात विषमता निर्माण झाली आहे. लहान लहान शेतकरी, काही भूमिहीन शेतमजूर यांचे प्रमाण अधिक असून त्यांचे दरडोई व एकूण उत्पन्न अतिशय खालावलेले आहे. शेती मधे तंत्रज्ञानाचा अभाव असून उत्पादन क्षमता कमी आहे. शेती पूरक व्यवसाय करणाऱ्यां पैकी पैकी सुतार, लोहार, चांभार, मांगइ. शेती धंद्याला पूरक संसाधनांची निर्मिती करत असून कुंभार, तेली, कोष्टी, न्हावी, धोबी हे लोक इतर महत्वाच्या दैनंदिन सेवा पुरविणारे आहेत. शहरी भागात सध्या मोठया प्रमाणावर वाढत असलेल्या आधुनिक औद्योगिक स्पर्धेमुळे ह्या व्यवसायांवर अरिष्ट कोसळत आहे. अर्थातच त्यांचे उत्पन्न अतिशय कमी असते. त्यांच्यापैकी काही जणांच्या व्यवसायात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे शक्य आहे परंतु इतरांना मात्र

नव्याच व्यवसायाकडे वळावे लागणार आहे. शेती क्षेत्राच्या विकासासाठी भू सुधारणा व जलसिंचनाच्या सुविधा उपलब्ध करून जास्तीत जास्त जमीन ओलिता खाली आणण्यासाठी प्रयत्न करणे ही काळाची गरज बनली आहे. शेतीची उत्पादन क्षमता वाढल्यास होऊ नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करण्याकडे शेतकरी आकर्षित होतो. शेतीवरील लोकसंख्येचा भार कमी करण्यासाठी इतर व्यवसाय व उद्योग धंदे वाढविण्याची व त्यासाठी लोकांना प्रोत्साहन देण्याची गरज आहे. शेती आणि इतर व्यवसाय यांच्या वृद्धीस गती देण्यासाठी आर्थिक सेवांचे जाळे निर्माण व विकसित करण्याची गरज आहे. वाहतूक आणि दळणवळणाची साधने, वीजपुरवठा, बाजाराची सोय, विपणन व्यवस्था, तांत्रिक सेवायांचा विकास करणे आवश्यक आहे.

**सामाजिक गरजा व सुविधा :**

स्वच्छता व आरोग्याच्या सोयी सुविधा यांचा ग्रामीण भागात अभावच आहे. बहुतेक ठिकाणी स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सोय, शौचालय व सांडपाणी विल्हेवाट, गावातील पक्के व रुंद रस्ते, दिवाबत्तीची सोय, औषधोपचाराची सोय, अशा सोयी सुविधांचा मोठ्या प्रमाणात अभाव असलेला जाणवतो. शिक्षणा बाबत ही काहीशी अशीच निराशा आहे. प्राथमिक शिक्षणाची सोय सुद्धा प्रत्येक खेड्यात नाही. त्यापुढील माध्यमिक, उच्च माध्यमिक, महाविद्यालयीन शैक्षणिक सोयी साहजिकच शहरां भोवती केंद्रित झाल्या आहेत. चांगल्या आणि सुखी जीवनासाठी शिक्षण व आरोग्य या सोयींचे महत्त्व अनन्य साधारण आहे. त्याच बरोबर आर्थिक विकासात ही त्यांचे स्थान महत्त्व पूर्ण आहे. शेती व इतर व्यवसायांच्या विकासासाठी शिक्षण हा महत्वाचा घटक आहे. चांगले आरोग्य हे उत्पादन क्षमता वाढविण्याच्या दृष्टीने उपयुक्त आहे. म्हणून आर्थिक विकासा इतकेच महत्त्व शिक्षण व आरोग्य योजनांना द्यायला हवे. असा विचार सामाजिक विकास योजनांची आखणी करताना स्वीकारण्यात आला.

**सामाजातील परस्पर संबंध व वैचारिक दृष्टिकोण:**

ग्रामीण समाज हा रूढी व परंपराप्रिय आहे. जाति व्यवस्थेच वर्चस्व ग्रामीण जीवनात अधिक प्रभावशाली आहे. जातिभेद व अस्पृश्यता, विषमता ही लोकशाही जीवन दृष्टीला लागलेली कीड आहे. यागोष्टींच अस्तित्व सुदृढ समाज व्यवस्थेला हानिकारक आहेच शिवाय आर्थिक व्यवहारांत ही त्यामुळे अडथळे निर्माण होतात. नीच व कनिष्ठ समजल्या जाणाऱ्या जातींतील लोकांनी उच्च वा प्रगत समजले जाणारे व्यवसाय करू नयेत, समाजातील मोठया वतनदारांच्या जमिनीवर मोल मजुरी (वेठबिगारी) करावी, अल्प वेतनात त्यांनी समाधानी रहावे अशा अनेक कल्पना जाति भेदांमुळे रुजले आहेत. ही व्यवस्थेला तडा देऊन, विशेषतः अस्पृश्यता, जातिभेद पाळण्याचा मानसिक रोगमुळा पासून नष्ट करणे, कनिष्ठ, दलित जातींना विकासाची आर्थिक संधी उपलब्ध करून देणे हा ग्रामीण विकासाच्या समस्येचा महत्त्वाचा भाग आहे. यासाठी प्रशासन यंत्रणा व सामूहिक कार्यक्रमांपेक्षा स्वयंस्फूर्त चळवळी अधिक प्रभावशाली ठरतात. मात्र शासन यंत्रणा व विशिष्ट योजना या परंपरागत रूढीं व सकेतांना प्रमाण मानणाऱ्या नकोत, परिवर्तनाच्या दृष्टीने त्या अनुकूल असाव्यात, अशी खबरदारी घेणे आवश्यक आहे.

**मूल्यमापन :**

1) सुरुवातीच्या काळात समुदाय विकास कार्यक्रमा विषयी लोकांमध्ये मोठ्या प्रमाणात उत्साह होता परंतु नंतरच्या काळात तो कमी होत गेला. स्थानिक विस्तार विकास कार्यक्रमात श्रमदानातुन जन सहभाग ही संकल्पना फारशी रुचली नाही. भू सुधारणा कार्यक्रमांना ही अपेक्षे प्रमाणे यश आले नाही. जल सिंचनाच्या कार्यक्रमांना या योजनेत हवे तितके स्थान दिले गेले नाही.

2) समुदाय विकास कार्यक्रमाच्या संदर्भात एक असाही विचार मांडला जातो की, त्यात उत्पादन वाढी पेक्षा समाज कल्याण कार्यक्रमांवर अधिक भर दिला गेला. परंतु विकासाच्या संकल्पनेल मूर्तरूप आणण्यासाठी प्रथम लोकांची आर्थिक स्थिती सुधारली पाहिजे, त्यांच्या उत्पन्नात वाढ झाली पाहिजे. म्हणून ग्रामीण विकासाच्या योजनांत समाज कल्याण कार्यक्रमांपेक्षा शेती व अन्य व्यवसायांतील उत्पादन क्षमता वाढविण्यावर भर द्यायला हवा.

3) महाराष्ट्राच्या निर्मिती नंतर ग्रामविकासाच्या क्षेत्रात राज्याने विविध कार्यक्रम राबविले आहेत. 1962 पासून राज्यात जिल्हा परिषदांची स्थापना करण्यात आली.

4) विकेंद्रीकरणाच्या तत्त्वानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांना प्रोत्साहन देणे व जनतेला गावातील स्थानिक तसेच शासकीय उपक्रमात सहभागी होण्यास उत्तेजन देणे, व विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न केले गेले.

5) ग्रामस्तरावर, पंचायत समिती, जिल्हा विभाग व राज्यस्तरावर उत्कृष्ट व उल्लेखनीय विकास कार्य करणाऱ्या ग्रामपंचायतींना प्रोत्साहन म्हणून राज्य शासनाने बक्षीसे देण्याची योजना सुरू केली. त्यामुळे ग्रामविकासाला चांगला वेग मिळाला आहे.

6) समुदाय विकास कार्यक्रम अंमलबजावणीने ग्रामीण अर्थव्यवस्थेवर निश्चितच प्रभाव पडला आहे.

7) चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात सामूहिक विकास गटांची एकूण संख्या 450 च्या जवळ पास होती. तिसऱ्या योजनेत त्यात 40 जमाती विकास गटांचा करण्यात आला.

8) सकस आहार योजना विविध गटांसाठी लागू करण्यात आली तसेच ग्रामीण पाणी पुरवठा योजना अंमलात आणली आहे.

9) जिल्हा परिषदा आपल्या क्षेत्रातील जलसिंचनाची कामे पार पाडतात. तिसऱ्या योजना काळात त्यांनी एकूण 1780+ छोट्या बंधाऱ्यांची कामे हाती घेतली. त्यांमुळे 1275 हे. भु क्षेत्र सिंचना खाली झाली.

10) ठाणे व नासिक जिल्ह्यांत पालेमोड निर्मूलन योजनेची सुरुवात केली गेली त्याद्वारे सावकारांकडून आदिवासींच्या होणाऱ्या पिळवणुकीस आळा बसला. अशा रीतीने ग्रामीण विकासाचे सर्वंकष प्रयत्न राज्यात चालू आहेत.

**संदर्भ सूची :-**

1) महाराष्ट्र शासन, गामविकास विभाग, पंचायत राज्य मूल्य मापन समितीचा अहवाल, मुंबई, १९७४..

2) Government of India, Report of the Committee on Community Development and Panchayati Raj, New Delhi, 1957.

3) Jain S. C. Community Development and Panchayati Raj in India, Bombay, 1967.

4) https://mr.m.wikipedia.org

5)https://mr.vikaspedia.in/education/childrens-corner/90593094d92593693e93894d92494d930/93892e942939-93593f91593e938

6)https://en.m.wikipedia.org/wiki/1971_Census_of_India

7) ग्रामीण विकासके विविध आयाम, लेखक- जनक सिंह मीना